कार्यवाह
शांताराम पंदेरे
चव्हाण निवास
खोकडपुरा
औरंगाबाद ४३१ ००१

सहकार्यवाह
मधु मोहिते
पोतदार बिल्डिंग
शास्त्रीनगर कळवा,
जि. ठाणे ४०० ६०५

मध्यवर्ती कार्यालय
द्वारा : अजित सरदार
राही चेंबर्स,
२० सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०
फोन : ५८८०९

युक्रांद

# युवक क्रांती दल, महाराष्ट्र

जावक क्र. Inland – agenda for 14th annual meet (30th April, 1st & 2nd May 1989) दिनांक ३१ मार्च १९८९

क्रांतिकारक अभिवादन.

युक्रांदचे चौदावे वार्षिक शिबीर रवि, सोम, मंगळ ता. ३० एप्रिल, १ मे आणि २ मे १९८९ या दिवशी ~~मुंबई~~ पुणे येथे आयोजित केले आहे. शिबिराची सविस्तर कार्यक्रमपत्रिका आपणांस लवकरच पाठवत आहोत. तत्पूर्वी मुद्दाम हे पत्र.

शिबिराच्या उद्घाटनसत्रानंतर संपूर्ण दिवस युक्रांदचे हितचिंतक आणि मित्र यांच्यातील खुल्या चर्चेसाठी राखून ठेवला आहे. आपण या कार्यक्रमास उपस्थित राहून चर्चेत सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

महाराष्ट्रात संसदबाह्य राजकीय चळवळ उभारणाऱ्या मोजक्या संघटनांपैकी युक्रांद एक आहे. १९६७ साली युक्रांदची स्थापना झाली तेव्हापासून देशाच्या व महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक स्थित्यंतरे झाली. त्यांचे पडसाद चळवळीवर उमटल्याखेरीज राहिले नाहीत. काहीवेळा अत्यंत प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली. चळवळीत चढउतार आले. या सर्वांमधून चिकाटीने आणि निष्ठेने आपले काम संघटनेने सातत्याने चालवले आहेत. एवढा प्रदीर्घ अनुभव गाठीशी असलेली; लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षतेचे तत्त्वज्ञान मानणारी; आणि स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, विज्ञाननिष्ठा यांवर आधारित वर्गविहीन, जातिविहीन समाज निर्माण करण्याचा संकल्प घेऊन काम करणारी युक्रांद ही बहुधा महाराष्ट्रातली एकमेव संघटना असेल.

ग्रामीण भागातील भटके विमुक्त, दलित, भूमिहीन, स्त्रिया आदी घटकांमध्ये, त्याचप्रमाणे हमालमापाडी, सहकारी दूध संघटना, नगरपालिका कर्मचारी व इतर कामगार चळवळींत तसेच युवक-विद्यार्थी चळवळीत युक्रांद कार्यशील आहे. संसदबाह्य संघटनांच्या तसेच पुरोगामी पक्ष-संघटनांच्या विविध व्यासपीठांवर युक्रांद सक्रिय आहे. पुणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर या शहरात आणि रायगड, पुणे, नगर, औ'बाद, ~~रायगड~~ जालना इ. जिल्ह्यांत मिळून १०-१२ पूर्णवेळ कार्यकर्ते काम करत आहेत. अशा या युक्रांदच्या चळवळीशी आपला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आलेला आहे. तो पुनर्प्रस्थापित करण्यासाठी आपणांस हे आग्रहाचे निमंत्रण करीत आहोत. सहकार्याच्या अपेक्षेत,

आपला,

अजित सरदार

कार्यवाह